بسم اللہ الرحمٰن الرحیم نحمدہ و نصلی علی رسولہ الکریم و علی عبدہ المسیح الموعود
لا الٰہ الا اللہ محمد رسول اللہ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# बदर युद्धातील परिस्थिती व प्रसंगाचा संक्षिप्त उल्लेख

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक ७ जुलाई २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ. بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ. الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ. اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ. صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ.

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिहाच्या पठनानंतर हुजूर अनवर म्हणालेः मागच्या प्रवचनात विरोधींवर मुसलमानांचा रुबाब आणि अबु जहल आणि उतबाचे युद्धात सहभागामध्ये मतभेदाबद्दल सांगण्यात आले होते, पुढे अबु जहलच्या निरर्थक टिप्पणीमुळे उतबाने युद्धाची घोषणा केली आणि याप्रकारे युद्ध पुर्ण रूपाने सुरू झाले.

उतबा बिन रबिआ, त्याचा भाऊ (शैबा बिन रबिआ) आणि सुपुत्र वलीद बिन रबिआ यांच्या दरम्यानातून बाहेर निघून युद्धासाठी निमंत्रण दिलं. हजरत अली सांगतात की त्याची ही प्रक्रिया पाहून काहीं अनसार सोबती त्याला उत्तर देण्यास गेले त्यावर तो म्हणाला, तुम्ही कोण आहेत? त्यांचे उत्तर जाणून तो म्हणाला माझा तुमच्याशी काहीही देणं घेणं नाही, मी फक्त माझ्या चुलत्यांशी युद्ध करायला आलोय आणि तो जोराने म्हणाला, हे मुहम्मद (स.) आमच्या नातलागांपैकी कोणाला तरी युद्धात पाठव. पवित्र पैगंबर म्हणाले, हे हमजा, हे अली आणि हे उबैदा बिन हारिस, उठा! हजरत हमजा उतबाकडे निघाले, हजरत अली सांगतात की, मी शैबाकडे गेलो, आणि उबैदा आणि वलीद मध्ये युद्ध सुरू झाले आणि दोन्ही एकमेकावर हल्ला करून गंभीर रूपाने जखमी झाले. परत आम्ही वलीदकडे वळलो आणि त्याचा वध केला आणि उबैदाला कैद करून घेऊन आलो. हजरत हमजा आणि हजरत अली ने बाकीच्या विरोधींना देखील ठार मारले.

हजरत हमजा आणि हजरत अली यांनी त्यांच्या सोबत लढणारे हजरत उबैदा बिन हारिस यांना आपल्या टुकडी मध्ये घेऊन आले आणि त्यावेळी त्यांचा पाय युद्धामध्ये कापला गेला होता, जेव्हा त्यांना पवित्र पैगंबर यांच्या सेवेत हजर करण्यात आले तेव्हा त्यांनी विचारले की, हे पैगंबर मी शहीद नाही झालं ? यावर हुजूर (स.) म्हणाले, खचितच तू शहीद आहेस. हजरत उबैदाला युद्धात झालेल्या जखमातून ते बरे होऊ शकले नाही आणि बदर युद्धातून परताना ते मरण पावले.

जेव्हा दोन्ही संघ युद्धात भिडले तेव्हा अबु जहल याने अशी प्रार्थना केली की हे परमेश्वरा आमच्यामधून जो नातेवाईकांमध्ये विभाजन करतो आणि अशी कृत करतो जी आजतागायत झालेली नाही, अशा मनुष्याचा तू वध कर.

हजरत अपेक्षित मसीह व महदी सांगतात की, अबु जहलच्या शब्दातून अभिप्रेत होते की त्याला हमी होती की पवित्र पैगंबराचे जीवन अशुद्ध आणि अपवित्र होते (अल्लाह क्षमा करो). म्हणूनच त्याने आवेगाने प्रार्थना केली पण या प्रार्थनेनंतर तो एक तास देखील जीवंत राहू शकला नाही आणि ईश्वरीय प्रारब्धाचा फळ झाला आणि ज्यांच्या पवित्र जीवनावर तो काळिमा लावण्याचा प्रयत्न करत होता ते या मैदानातून यशस्वी होऊन परतले.

मुसलमानांच्या विरूद्ध त्यांच्यापेक्षा संख्येने तिप्पट मोठा लष्कर सर्व शस्त्रास्त्राने भरलेला या उद्देशाने निघाला होता की तो इस्लामचा नाव जगाच्या पाठीवरून पुसून टाकेल. तसे पाहता मुसलमान संख्येत कमी होते पण श्रद्धाने भरलेल्या या पुरूषांमध्ये एक अनन्यसाधारण शक्ती आणि उर्जा होती. हजरत उमर यांचे एक स्वतंत्र झालेले दास हजरत महीज यांना तीरंदाजी साठी लक्ष्य बनवण्यात आला, ज्याने ते शहीद देखील झाले, मुसलमानांपैकी सर्वप्रथम हौतात्म्य पत्करण्याचा मान त्यांना प्राप्त आहे.

पवित्र पैगंबर म्हणाले की, जो कोणी आज धैर्याने आणि बक्षीस प्राप्त करण्याच्या हेतूने या युद्धात सहभाग घेईल आणि पळ काढणार नाही, तो नक्कीच स्वर्गात दाखल होईल. हे ऐकून बनी सलमा कबिल्याचे उमैर बिन हमाम (जे त्यावेळी खजूर खात होते) म्हणाले, वाह वाह म्हणजे माझ्यात आणि स्वर्गात आता फक्त इतकाच भाग आहे की विरोधी मला ठार मारतील, असे म्हणत त्यांनी तलवार उगारली आणि पूर्ण क्षमतेने मैदानात उतरले आणि खूप लढले इतपर्यंत की अखेरीस ते शहीद झाले. हजरत उफरा चे सुपूत्र औफ बिन हारिस पवित्र पैगंबराला विचारले की हे अल्लाहचे पैगंबर, अल्लाह आपल्या दासाच्या कोणत्या कर्मातून खूश होतो? ते म्हणाले, शत्रूला चिलखत न घालता वध करण्यातून, हे ऐकून त्यांनी आपली चिलखत काढली आणि अनेक शत्रूंचा वध केला आणि अखेरीस लढत लढत शहीद झाले.

युद्धाच्या समाप्तीनंतर पवित्र पैगंबर (स.) मृत्त देहांच्या दरम्यान उभे झाले आणि अबु जहल ला शोधण्याची कारवाही सुरु केली. जेव्हा तो सापडला नाही तेव्हा त्यांनी अशी प्रार्थना केली, اَللّٰهُمَّ لَا تُعْجِزْنِيْ فِرْعَوْنَ هٰذِهِ الْاُمَّةِ म्हणजे हे अल्लाह, तू मला या राष्ट्राच्या फिरऔन समक्ष असहाय्य करू नको. पवित्र पैगंबरांच्या सांगण्यावरून हजरत अब्दुल्लाह बिन मसूद यांनी अबू जहलच्या गुडघ्याच्या जखमावरून त्याचा शोध लावला. तो अजून जीवंत होता, पवित्र पैगंबरांच्या विचारण्यावर तो म्हणाला की, माझी मान थोडी लांब करून कापा. ते म्हणाले, तुझी ही इच्छा पूर्ण होणार नाही आणि मान लांब न करताच कापली आणि हुजूरच्या समक्ष टाकली, तेव्हा हुजूर यांनी परमेश्वराचे कृतज्ञ होत म्हणालेः अल्लाहच तो एकमेव विधाता आहे ज्याच्याविरूद्ध अन्य कोणीही उपासनेच्या लायक नाही. एका दुसऱ्या कथनात असे सांगण्यात आले आहे की, पैगंबरांनी अशी प्रार्थना केली की, ते तुझ्या अटकेतून बाहेर पडू नये. हजरत कतादाः सांगतात की, पवित्र पैगंबर म्हणालेः प्रत्येक धर्म आणि राष्ट्राचा एक फिरऔन असतो आणि या राष्ट्राचा फिरऔन अबु जहल आहे.

हजरत अपेक्षित मसीह म्हणतातः अबु जहल'ला फिरऔन ची उपाधी दिली गेली पण माझ्या नजरेत तो त्यापेक्षाही (पापकर्मामध्ये) मोठा होता. फिरऔन ने तर शेवटी कबूल केले की, اٰمَنْتُ اَنَّهٗ لَا اِلٰهَ اِلَّا الَّذِيْ اٰمَنَتْ بِهٖ بَنُوْا اِسْرَآءِيْلَ अर्थात-मी त्या एकमेव परमेश्वराचा स्वीकार करतो ज्याचा स्वीकार बनी इस्त्राईलनी केला आहे. पण अबु जहलने शेवट पर्यंत परमेश्वराला स्वीकार केला नाही,

मक्केत सर्वत्र उपद्रव माजवणारा तोच एकमेव होता, जो अत्यंत गर्विष्ठ, स्वार्थी आणि मोठेपणाचा अभिलाषी होता.

हजरत इमाम राजी (र.ह) सुरह अनफाल ची आयत وَمَا رَمَيۡتَ اِذۡ رَمَيۡتَ وَلٰكِنَّ اللّٰهَ رَمٰى चे भाष्य करताना लिहतात की, जेव्हा कुरैश लष्कर घेऊन आले तेव्हा पवित्र पैगंबर यांनी अशी प्रार्थना केली, हे परमेश्वरा! हा कुरैश कबिला शस्त्राने भरून येत आहे, हे सिद्ध करण्यासाठी की तुझा संदेष्टा लबाड आणि खोटारडा आहे. हे अल्लाह! मी तुझ्याकडून ती मदत इच्छितो ज्याला प्रदान करण्याचा वादा तू केला होतास. तेव्हा जिब्राईल प्रकट झाले आणि म्हणालेः हे अल्लाहचे दूत! मूठभर माती घ्या आणि विरोधींवर फेकून द्या. जेव्हा युद्ध सुरू झाले तेव्हा पैगंबरांनी मूठभर माती (वाळू) उचलली आणि विरोधीं समारे फेकून दिली ज्यानंतर विरोधी डोळे मळत बसले आणि परिणामस्वरूप त्यांच्या पदरी अपयश आले. तेव्हा अल्लाह म्हणतोः وَمَا رَمَيۡتَ اِذۡ رَمَيۡتَ وَلٰكِنَّ اللّٰهَ رَمٰى अर्थात तू वाळूचे कण फेकले होतेस तेव्हा ते तू नव्हतेस, तर अल्लाहनेच ते फेकले होते, कारण एक मनुष्याच्या हाताने फेकण्यामुळे त्याच्या समक्ष असलेला व्यक्तिच त्रस्त होऊ शकतो पण परमेश्वराचे ते कार्य स्वतः असल्याने तो सर्वत्र पसरले. म्हणजेच जरी तो कार्य पवित्र पैगंबरांच्या हस्ते घडले पण त्याचा परिणाम परमेश्वराकडून पारित झाला.

हजरत जिब्राइल प्रेषिताकडे आले आणि विचारलेः बदरच्या युद्धात सामील होणाऱ्या मुसलमानांना तुम्ही कोणता दर्जा देणार ? ते म्हणालेः सर्वोत्तम मुसलमान किंवा अशा प्रकारची एखादी संज्ञा. जिब्राईल म्हणालेः मग जे देवदूत या युद्धात सहभाग घेत आहेत ते देखील सर्वोत्तम च्या श्रेणीत गणले जातील.

काहीं लोकांच्या मते, या युद्धात देवदूतांचा सहभाग हा केवळ रूपक प्रकारचा होता जेणेकरून मुसलमानांना मानसिक ताकद प्राप्त होईल आणि प्रत्यक्षात देवदूत सहभागी झाले नव्हते. हुजूर अनवर यांनी याचा खंडन काहीं अहादीस प्रस्तूत करून केला आणि म्हणालेः हो, हा संशय उद्भवू शकतो की सहाय्यतेसाठी तर एकच देवदूत पुरेसा होता तर अनेकांची काय गरज. इमाम बिन कसीर लिहतात की देवदूतांचे अवतरण आणि मुसलमानांना याची (अवतरण्याची) खबर ही शुभवार्ताच्या स्वरूपात होती अन्यथा परमेश्वर त्याशिवाय देखील मुसलमानांना विजय दिला असता.

जेव्हा युद्ध पेटले तेव्हा काही क्षणातच विरोधींच्या लष्करामध्ये बेचैनी आणि स्तब्धता वावरली होती आणि मुसलमानांकडून होणाऱ्या ताबडतोब हल्ल्यांने ते आश्चर्यचकित झाले होते, आणि त्यांचे लष्कर विस्कळीत झाले आणि चेंगरा-चेंगरी उमजली, मुसलमानांनी त्यांचा पाठलाग केला आणि ते पराजित होऊन परतले.

हा युद्ध विरोधींचे पराजय आणि मुसलामानांच्या विजयावर संपन्न झाला आणि या युद्धात १४ मुसलमान (६मुहाजिर आणि ८ अन्सार) यांनी हौतात्म्य पत्करला पण विरोधींना खूप मोठे नुकसान या युद्धभूमितून झाले, त्यांचे ७० सैनिक मारले गेले आणि ७० कैदी बनले ज्यामध्ये त्यांचे मोठे प्रधान, प्रमुख आणि सेनापती सामील होते.

प्रवचनाच्या शेवटी हुजूरनी प्रार्थना करण्याची घोषणा केली आणि म्हणालेः पॅलेस्टाईन च्या मुसलानांसाठी प्रार्थना करा अल्लाह त्यांचे रक्षण करो आणि त्यांचे सर्व त्रास दूर करो.

तसेच आजकाल स्वीडन मध्ये अभिव्यक्ति स्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली जो अपराध आणि गुन्हे होत आहेत आणि याद्वारे ते मुसलमानांच्या धार्मिक व आध्यात्मिक भावना आहत करत आहेत अशा सर्वांना अल्लाह स्वतः शिक्षा देवो.

तसेच फ्रांस मध्ये देखील मुसलमानांवर निशाना साधून त्यांच्यावर अत्याचार केला जात आहे आणि याविरूद्ध मुसलमानांची प्रतिक्रिया देखील चूकीची आहे. म्हणून मुसलमानांनी आपली कृती इस्लामी शिकवणूकीनुसार प्रदर्शित करणे गरजेचे आहे. जेव्हा मुसलमानांची उक्ती व कृती इस्लामी शिकवणीनुसार प्रकट होईल तेव्हाच त्यांना अस्सल यश प्राप्त होईल. मी वारंवार सांगत आलो आहे की, **हे जग एका मोठया विध्वंसाकडे लोटत आहे**. अल्लाह सर्वांवर दया करो.

तसेच पाकिस्तान मध्ये राहणाऱ्या अहमदींसाठी देखील प्रार्थना करा, अल्लाह नेहमी त्यांना प्रत्येक दुष्ट घटनापासून सुरक्षित ठेवो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَن یَّھْدِہِ اللّٰہُ فَلاَ مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلاَ ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ أَنْ لَآ اِلٰہَ اِلاَّ اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ، عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔